**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ , अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त द्वितीय अपिल**

**अपिल क्र. १४२०/२०११**
जा.क्र.
दिनांक -

अर्जदार तथा अपिलकर्ता
श्री शरद देविदास खिल्लारे
मु.पो. साखळी बु. ता.जि.बुलडाणा

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
जिल्हा परिषद, बुलडाणा

२. जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक (ग्रामपंचायत विभाग)
जिल्हा परिषद, बुलडाणा

**(आदेश पारीत दिनांक ०५/०१/२०१२)**

**- निर्णय -**

अर्जदार तथा अपिलकर्ता गैरहजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे व स्वत: जन माहिती अधिकारी म्हणुन श्री के.एस.झाल्टे, अधिक्षक, ग्रामपंचायत विभाग, जि.प. बुलडाणा हजर आहे.

अर्जदार तथा अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जोडपत्र-अ नुसार दि.२०/१/११ रोजी मुख्य कार्यपालन अधिकारी (पंचायत विभाग) जि.प. बुलडाणा यांचेकडे अर्ज करुन माहिती मागितली होती. अर्जदाराने प्रपत्र-ब नुसार दि.५/३/११ रोजी मुख्य कार्यपालन अधिकारी जि.प. बुलडाणा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर प्रकरणातील प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.) जि.प. बुलडाणा यांनी १९/३/११ ला सुनावणी घेतली व २१/३/११ ला आदेश निर्गमित केला. सदर निर्णयामध्ये नमुद केले आहे की, सहायक जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार विषयांकित नस्ती प्रभारात मिळालेली नाही व अभिलेख कक्षात आढळली नाही त्यामुळे माहिती देता आली नाही यावर कार्यालय प्रमुख तथा अपिलीय अधिकारी यांनी नस्तीचा शोध घेण्यासाठी यापुर्वीचे कार्यरत सहाय्यक लिपीक व अधिक्षक यांना पत्र देण्याचे आदेशीत केले व नस्ती प्राप्त होताच अपिलकर्त्यास तात्काळ माहिती देण्याचे सुचित केले असे प्रथम अपीलाच्या आदेशामध्ये नमुद केले आहे. अर्जदाराने या आयोगाकडे दि.१/६/११ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीलासंबंधी आज सुनावणी घेतली असता ग्रामपंचायत कर्मचारी यांची १० टक्के आरक्षणामधुन निवड प्रक्रियेसंबंधीची नस्ती अजुनही मिळाली नाही व त्यामुळे अर्जदाराला माहिती देता आली नाही असे श्री झाल्टे, अधिक्षक यांनी सुनावणी दरम्यान सांगितले.

सुनावणीनंतर उशिरा दुपारी २.०० वाजता अर्जदार या आयोगासमोर हजर झालेत व त्यांनी अद्याप माहिती मिळाली नाही असे सांगितले व नस्ती गहाळ कशी झाली याबाबत चौकशी व्हावी अशी विनंती केली. नस्तीचा शोध घेण्यासाठी यापुर्वीचे कार्यरत सहाय्यक लिपीक व

अधिक्षक यांना पत्र देण्याचे आदेशीत केले व नस्ती प्राप्त होताच अपिलकर्त्यास तात्काळ माहिती देण्याचे सुचित केले असे प्रथम अपीलाच्या आदेशामध्ये नमुद केलेले आहे. तेंव्हा सदर आदेशानुसार संबंधितांस नस्तीचा शोध घेण्यासंबधी पत्र दिले काय व त्यानुसार त्यांनी काय अहवाल सादर केला त्याची माहिती अर्जदाराला पाठविणे अपेक्षित होते. तसेच श्री ए.डी.सोळके, अधिक्षक पं.स. मेहकर यांना उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बुलडाणा यांनी २६/१२/११ ला पत्र दिले त्यामध्ये असे म्हटले आहे की, ग्रा.पं. विभागामध्ये कार्यरत असतांना ग्रा.पं. कर्मचारी यांची १० टक्के आरक्षणामधुन निवड प्रक्रिया करण्याबाबतची नस्ती प्रभारामध्ये देण्यात आली नाही व नस्ती अप्राप्त असल्यामुळे अर्जदाराला माहिती देता आली नाही. तरी नस्ती कार्यालयास उपलब्ध करुन द्यावी व ती न दिल्यास प्रशासकीय कारवाई करण्यात येईल याची गांभिर्यपुर्वक नोंद घ्यावी असे श्री सोळके यांना कळविले आहे. तेंव्हा याबाबतीत काय कारवाई करण्यात आली यासंबंधी सुध्दा खुलासा सादर केलेला दिसत नाही.

तेंव्हा वरील प्रकरणामध्ये उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जि.प. बुलडाणा यांना आदेश देण्यात येत आहे की, ग्रामपंचायत कर्मचारी यांची १० टक्के आरक्षणामधुन निवड प्रक्रियेसंबंधीची नस्ती श्री सोळके, अधिक्षक पं.स. मेहकर यांनी अजुनपर्यंत उपलब्ध करुन दिली नसेल तर त्यांचेवर नस्ती गहाळ केल्याप्रकरणी जबाबदारी निश्चीत करावी व नियमानुसार त्यांचेविरुध्द कारवाई करुन तसा अहवाल हा आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसामध्ये या आयोगास पाठवावा व त्याची एक प्रत अर्जदाराला पाठवावी. तसेच सदर नस्ती उपलब्ध झाल्यास अर्जदाराला मागितलेली माहिती सध्याचे अधिक्षक ग्रा.पं. विभाग जि.प. बुलडाणा यांनी विनाशुल्क पुरवावी व तसा अहवाल या आयोगास पाठवावा.

**- आदेश -**

१. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जि.प. बुलडाणा यांना आदेश देण्यात येत आहे की, ग्रामपंचायत कर्मचारी यांची १० टक्के आरक्षणामधुन निवड प्रक्रियेसंबंधीची नस्ती श्री सोळके, अधिक्षक पं.स. मेहकर यांनी अजुनपर्यंत उपलब्ध करुन दिली नसेल तर त्यांचेवर नस्ती गहाळ केल्याप्रकरणी जबाबदारी निश्चीत करावी व नियमानुसार त्यांचेविरुध्द कारवाई करुन तसा अहवाल हा आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसामध्ये या आयोगास पाठवावा व त्याची एक प्रत अर्जदाराला पाठवावी.

२. ग्रामपंचायत कर्मचारी यांची १० टक्के आरक्षणामधुन निवड प्रक्रियेसंबंधीची नस्ती उपलब्ध झाल्यास अर्जदाराला मागितलेली माहिती सध्याचे अधिक्षक ग्रा.पं. विभाग जि.प. बुलडाणा यांनी विनाशुल्क पुरवावी व तसा अहवाल या आयोगास पाठवावा.

वरीलप्रमाणे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**प्रत - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा**

जिसकार/